# बिसेन डेन्टल केअर

**डॉ.दिप(पंकज) बिसेन** **डॉ.खुशबू बिसेन(पटले)**



दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक २९ | बुधवार,दि.२५ जून २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## १०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प-मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई, दि. २४ पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीज पुरवठा देऊन शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. राज्यात शाश्वत विकासास चालना देण्यासाठी महानिर्मितीतर्फे १,०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प ङ्गमुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.०फ अंतर्गत लवकरच कार्यान्वित होणार आहेत. या प्रकल्पांमुळे राज्यातील तीन लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

महानिर्मिती ही म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्यादित या कंपनीची संपूर्ण मालकीची उपकंपनी असून, सुमारे १३,८८० मेगावॅट क्षमतेसह भारतातील सर्वात मोठ्या राज्य-नियंत्रित विद्युत उत्पादकांपैकी एक आहे. नॅशनल थर्मल पॉवर कंपनी नंतर ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची राज्य मालकीची जनरेशन कंपनी आहे. औष्णिक, वायू, जल विद्युत आणि सौर असे ऊर्जा उत्पादन क्षेत्रात वैविध्य असलेली महानिर्मिती ही कंपनी नवीकरणीय ऊर्जेचे प्रकल्प सुरू करत आहे, ज्यामुळे वीज ग्राहकांना कमी दरात वीजपुरवठा करत कार्बन उत्सर्जनात घट होण्यास मदत होणार आहे.

### जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट

द रॉक्फेलर फाउंडेशन,इकीया फांउडेशन आणि बेझॉज अर्थ फंड यांच्या सहकार्याने स्थापन झालेली जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट) ही संस्था विकसनशील देशांमध्ये न्याय्य, समतोल व वेगवान हरित ऊर्जेसाठी मदत करते. जीईएपीपी इंडिया ही जीईएपीपी एलएलसीची भारतीय शाखा असून, भारतात विशेषतः वितरणक्षम ऊर्जेसाठी उपयुक्त उपक्रमांची अंमलबजावणी करत आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०

पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीज पुरवठा देऊन शेतीची उत्पादनक्षमता वाढविणे हे राज्य शासनाचे ध्येय आहे. कृषी ग्राहकांच्या सेवाखर्चात कपात करून शाश्वत ऊर्जेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आहे. यातून वितरित पद्धतीने नवीकरणीय ऊर्जा वापरून कृषी वापरासाठी सौर प्रकल्प जोडण्यात येतात. सन २०२५ पर्यंत सुमारे ३०% फीडरचे सोलरायझेशनचे उद्दिष्ट ङ्गमिशन २०२५फ म्हणून निश्चित केले आहे, ज्यामध्ये शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी ०.५ मेगावॅट ते २५ मेगावॅट क्षमतेचा कृषी भार असलेल्या वितरण उपकेंद्रापासून ५ - १० किमी परिघात विकेंद्रित सौर प्रकल्प उभारले जातात.

### महानिर्मितीला सौर ऊर्जा योजनेसाठी जीईपीपीची मदत

जीईपीपी इंडिया हा प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रकल्प मॉनिटरिंग युनिट (झचण) सुविधा आणि एक डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करत आहे, माहितीचे संकलन, या प्रकल्पाची सद्यस्थिती आणि प्रकल्पांचे सुलभ व्यवस्थापन शक्य होईल. जीईपीपीच्या तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा उपयोग करून मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.० ची प्रभावी अंमलबजावणी करणे. महाराष्ट्रात शाश्वत विकासास चालना देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्येश आहे.

हे सौर ऊर्जा प्रकल्प वेळेत पूर्ण करणे करता धोरणात्मक संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार असून ही समिती मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेबाबत मार्गदर्शन करेल. या समितीमध्ये सर्व सहभागधारक यांचा समावेश असणार आहे. जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅने व महानिर्मितीतर्फे सेंट्रल डॅश बोर्ड तयार करण्यात येणार असून यामार्फत जमीन संपादन ते प्रकल्प उभारणी प्रगती यांचे दैनंदिन तत्वावर अवलोकन करण्यात येणार आहे. सर्व भागधारकांसाठी या डॅश बोर्ड वापराबाबतचे प्रशिक्षण देण्यात येऊन हे सौर प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. या प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत.

## अरण्यऋषी मारुती चितमपल्लींच्या अस्थी माधवझरीत विसावा घेणार!

**गोंदिया,**-प्रतिभावंत लेखक, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीशास्त्रज्ञ व वन्यजीव अभ्यासक, संपूर्ण जीवन वनविद्येचा अभ्यास आणि लेखनासाठी समर्पित करणारे व्यासंगी संशोधक व वनाधिकारी अरण्यऋषी पद्मश्री मारुती चितमपल्ली यांनी बुधवारी सोलापुरात अंतिम श्वास घेतला. त्यांच्या अंतिम संस्कारानंतर त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या अस्थी त्यांचे गुरू माधवराव पाटील डोंगरवार यांच्या माधवझरी (धाबेपवनी) येथील समाधीस्थळी विसावणार या वृत्ताने दोन्ही मित्र पुन्हा एकदा जवळ येणार असे वाटत होते.मात्र, वनविभागाच्या वरिष्ठ अधिकार्यांना याबाबत विचारणा केल्यावर अशाप्रकारची कुठलीही माहिती आमच्यापर्यंत मारुती चितमपल्ली यांच्या कुटुंबियांच्यावतीनेच नव्हे तर आमच्या विभागाच्या वरिष्ठांकडून सुध्दा काहीच सुचना नसल्याचे सांगितले.सोबतच अरण्यऋषी पद्मश्री यांच्या अस्थी नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानातील माधवझरी परिसरात पुरण्याबाबतचे वृत्तच खोडसाळ असल्याचे सांगितले.गोंदिया जिल्ह्याच्या अर्जुनी मोरगाव तालुक्यातील धाबेपवनी येथील अरण्यपुत्र माधवराव पाटील डोंगरवार हे पद्मश्री चितमपल्ली यांचे गुरू. वन्यप्राण्यांना उन्हाळ्यात पाण्याची चणचण भासू नये म्हणून माधवरावांनी माधवझरी हा परिसर निर्माण केला. तिथेच माधवराव पाटील डोंगरवार यांची समाधी आहे. गुरूंचा अन्त्यविधी जिथे पडला, तिथेच माझ्याही अस्थी पुरण्यात याव्या, अशी इच्छा अरण्यऋषींनी व्यक्त केली होती.

# जिल्हा बँकेच्या १८ जागेकरीता २९ जून रोजी मतदान

# ३८ उमेदवार रिगणात,दोन उमेदवार निर्विरोध विजयी

## जिल्हास्तरावरील गटाकरीता चुरस,आजी माजी आमदारांच्या भाग्याचा फैसला होणार





**गोंदिया**-गोंदिया जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेची निवडणूक येत्या २९ जून २०२५ रोजी होणार आहे.त्याकरीता उमेदवारांच्या प्रचाराने वेग घेतला असून जिल्हातरीवरील गटातील निवडणूक चुरसीची ठरण्याची चिन्हे बघावयास मिळत आहेत.त्यातच निवडणूक अधिकारी यांनी देवरी सेवा सहकारी गटातून परविर्तन पॅनलचे गोपाल तिराले यांचा रद्द केलेला उमेदवारी अर्ज न्यायालयाच्या निर्णयानंतर कायम राहील्याने या गटात सुध्दा आता चुरसीची निवडणूक होणार आहे.

विशेष म्हणजे जिल्हा स्तरावर दोन आजी माजी आमदार एकमेकाविरोध्दात रिंगणात आहेत.तर विद्यमान उपाध्यक्ष व सचिव हे सुध्दा एकमेकाविरुध्द रिंगणात आहेत.

या निवडणूकीत अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सर्वाधिक ५ उमेदवार रिंगणात आहेत.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बँकेचे विद्यमान अध्यक्ष माजी आमदार राजेंद्र जैन हे पगारदार व इतर नागरी संस्था गटातून निर्विरोध निवडून आले.या गटातून काँग्रेसचे माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांचे पुत्र प्रफुल गोपालदास अग्रवाल यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला.

त्याचप्रमाणे वैयक्तिक गटातून काँग्रेस गटाचे जिल्हा बँकेचे विद्यमान संचालक प्रफुल गोपालदास अग्रवाल हे निर्विरोध निवडून आले असून या गटातून राष्ट्रवादी काँग्रेसचे निखिल









राजेंद्र जैन यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला.

या निवडणूकीत काँग्रेस व राकाँ चा प्रत्येकी एक संचालक निर्विरोध निवडून आला आहे.तर उर्वरित १८ जागांकरीता मात्र निवडणूक होणार आहे. सेवा सहकारी संघटना व काँग्रेस यांच्यात या निवडणुकीकरीता युती झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.त्यामुळे भाजप राष्ट्रवादीच्या महायुतीला फटका बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे.विशेष म्हणजे

अनु.जाती/जमाती गटात आजी माजी आमदारामध्ये चुरस होणार आहे.तर तिरोडा सेवा सहकारी गटात विद्यमान आमदार विजय रहांगडाले यांच्या विरोधात काँग्रेसच्या वंदना हेमराज अंबुले रिंगणात असून या निवडणुकीकडे लक्ष लागले आहे.

**सेवा सहकारी गट** गोंदिया तालुका-सहकार पॅनलच्यावतीने केतन शिवशंकर तुरकर तर परिवर्तन पॅनलच्यावतीने संजय चौधरी,सेवा सहकारी गट आमगाव तालुका-सहकार पॅनलच्यावतीने भैरसिंह नागपुरे तर परिवर्तन पॅनल समर्थित सुभाष आकरे,सालेकसा तालुका सहकार पॅनलचे प्रभाकर दोनोडे व परिवर्तन पॅनलचे येजेंद्रकुमार कटरे,देवरी तालुका-सहकार पॅनलकडून प्रमोद संगिडवार तर परिवर्तन पॅनलकडून गोपाल तिराले,सडक अर्जुनी तालुका सहकार पॅनलचे गजानन परशुरामकर तर परिवर्तन पॅनलचे गंगाधर परशुरामकर,गोरेगाव तालुका-परिवर्तन पॅनल समर्थित दुर्गाप्रसाद ठाकरे तर सहकार पॅनलचे योगराज पारधी,तिरोडा तालुका परिवर्तन पॅनलकडून श्रीमती वंदना अंबुले तर सहकार पॅनलकडून विजय भरतलाल रहागंडाले व अर्जुनी मोरगाव तालुका गटातून सहकार पॅनलकडून केवलराम पुस्तोडे,परिवर्तन पॅनलकडून मोरेश्वर कोरे व विजयाबाई दयाराम कापगते अपक्ष रिंगणात आहेत.

**औद्योगिक गटातून** सहकार पॅनलकडून रेखलाल टेंभरे तर परिवर्तन पॅनलकडून अरुणकुमार दुबे,**जंगलकामगार सहकारी संस्था गटातून** परिवर्तन पॅनलकडून अशोक गुप्ता,सहकार पॅनलकडून अजयसिंह गौर व मृत्युंजय सिंह रिंगणात आहेत.**डेअरी गटातून** सहकार पॅनलकडून राजकुमार कुथे तर परिवर्तन पॅनलकडून पंकज यादव रिंगणात आहेत.**मत्स्यव्यवसाय गटातून** सहकार पॅनलकडून सावलराम मारबते तर परिवर्तन पॅनलकडून अजय हलमारे,**मजुर सहकारी संस्था** गटातून सहकार पॅनलकडून राजू नेमिचंद जैन तर परिवर्तन पॅनलकडून विजयकुमार राठोड,

**पगारदार गटातून** राजेंद्र हिरालाल जैन,**वैयक्तीक गटातून** प्रफुल गोपालदास अग्रवाल,**अनु.जाती जमाती गटातून** सहकार पॅनलकडून राजकुमार बडोले तर परिवर्तन पॅनलकडून दिलीप बनसोड,**महिला राखीव गटातून** सहकार पॅनलकडून रचना गहाणे,प्रिया हरिणखेडे तर





परिवर्तन पॅनलकडून ज्योती पटले व उषा मेंढे रिंगणात आहेत.

**व्हीजेएनटी गटातून** सहकार गटातून विनोद कन्नमवार,परिवर्तन पॅनलकडून दामोदर नेवारे,अपक्ष रघुनाथ मेश्राम रिंगणात आहेत.तर **ओबीसी गटातून** परिवर्तन पॅनलकडून राधेलाल पटले तर सहकार पॅनलकडून डॉ.अविनाश जायस्वाल रिंगणात आहेत.

### तीन तालुक्यात बंडखोरीः भाजपपुढे आव्हान

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्वच मतदार संघात चुरसीची निवडणूक होणार असून तालुका सहकारी मतदार संघात बंडखोरी झाल्याने भाजपपुढे आव्हान उभे झाले आहे. गोरेगाव तालुका सेवासहकारी मतदार संघातून भाजपचे दुर्गाप्रसाद ठाकरे व आमगाव तालुका सेवा सहकारी मतदार संघातून भाजपचे वरिष्ठ सहकार नेते सुभाष आकरे हे काँग्रेसप्रणित परिवर्तन पॅनलकडून रिंगणात आहेत. तर भाजपचे माजी आमदार स्व.दयाराम कापगते यांच्या पत्नी विजयाताई कापगते यानी सेवा सहकारी गटातून उमेदवारी कायम ठेवल्याने भाजपच्या अधिकृत उमेदवारासमोर आवाहन उभे झाले आहे.

# लाखो रुपयांच्या प्राणी उपचार केंद्राची दुर्दशा

## वैद्यकीय उपकरणे झाली गायब : इमारती आली मोडकळीस



**नवेगावबांध येथील प्राणी उपचार केंद्र तयार झाल्यानंतर प्रत्यक्ष उपचार सेवा सुरूच झाली नाही. सुरुवातीला आलेल्या साहित्यापैकी काही आम्ही दुसरीकडे हलवले आहे. काही साहित्य सध्या वापरात आहे आणि काही साहित्य कालबाह्य झालेले आहे. या सेंटरसाठी डॉक्टरची नियुक्ती झाली नसल्यामुळे आणि सुरुवातीपासूनच केंद्र नियमित सुरू न झाल्यामुळेच इमारतीची व साधनसामग्रीची स्थिती आज मोडकळीस आलेली आहे.**

**सदाशिव अवगान, वनपरिक्षेत्र अधिकारी**

**नवेगावबांध** :- नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान व नागझिरा अभयारण्यातील जखमी वन्यप्राण्यांवर त्वरित उपचार व्हावेत यासाठी ८ वर्षांपूर्वी लाखो रुपये खर्चुन उभारलेल्या अत्याधुनिक प्राणी उपचार केंद्राची पूर्णपणे दुर्दशा झाली आहे. या केंद्रातील पशुवैद्यकीय उपकरणे, उपचार कक्ष व सर्व सुविधा असलेली ही इमारत आठ वर्षांतच मोडकळीस आली आहे. तर ९० टक्क्यांहून अधिक उपकरणे चोरीला गेल्याची माहिती आहे.

नवेगावबांध-नागझिरा व्याघ्र प्रकल्प असल्याने या प्रकल्पातील जखमी वन्यप्राण्यांवर त्वरित उपचार करता यावे, नागपूर गोरेगाव येथे यासाठी धाव घ्यावी लागू नये या दृष्टीकोनातून हे अत्याधुनिक प्राणी उपचार केंद्र तयार करण्यात आले. यामुळे १७० किलोमीटरची पायपीटसुद्धा कमी होणार होती. शिवाय वन्यप्राण्यांवर वेळीच उपचार करून त्यांचे प्राण वाचविणे शक्य झाले असते. पण या उपचार केंद्राची आठ वर्षात पूर्णपणे वाट लागली आहे.

नवेगावबांध येथे नवीन निवासस्थानांची, सुरक्षा भिंतींची व विविध बांधकामे मोठ्या प्रमाणावर नियमबाह्य पद्धतीने सुरू असल्याचा आरोप आहे. या प्राणी उपचार केंद्राकडे संबंधित विभागाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याने या केंद्रातील अनेक वैद्यकीय उपकरणे चोरीला गेल्याची माहिती आहे. या सर्व प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी नवेगावबांध परिसरातील नागरिक, वन्यजीवप्रेमी व सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.हे केंद्र सुरु झाल्यास जखमी वन्य प्राण्यांतर वेळीच उपचार करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे याची लोकप्रतिनिधी दखल घेण्याची गरज आहे.

## खेमेंद्र कटरे यांना नागपूर विभागाचा ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार जाहीर



**मुंबई** : शासनाच्यावतीने सन २०१९, २०२०, २०२१, २०२२ व २०२३ या पाच वर्षातील ङ्गलोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कारफ पाच ज्येष्ठ पत्रकारांना जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये सन २०१९-राही भिडे, २०२०-सुधीर पाठक, २०२१-भाऊ तोरसेकर, २०२२-विजय बाविस्कर, दै.लोकमत आणि २०२३ - बाळासाहेब जाधव, दै.पुढारी यांना पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. एक लाख रुपये, मानचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

पत्रकारितेच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी राज्य शासनाच्यावतीने दिले जाणारे २०२१, २०२२ व २०२३ वर्षासाठीचे पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.सन २०२२ वर्षाकरीता नागपूर विभागाचा ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार हा वरिष्ठ पत्रकार खेमेंद्र कटरे यांना जाहीर झालेला आहे.कटरे यांना यापुर्वी २००७,२०१७ मध्ये सुध्दा हा पुरस्कार मिळालेला आहे.गोंदिया जिल्ह्यात तिसऱ्यांदा पुरस्कार मिळवणारे ठरले आहे.महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्रात जिल्हा प्रतिनिधी म्हणून काम करीत असून ते साप्ताहिक बेरार टाईम्सचे संपादक आहेत.त यांनी यापुर्वी नवराष्ट्र,सकाळ व पुण्यनगरी वृतपत्रात जिल्हा प्रतिनिधी म्हणून काम केले आहे.सामाजिक क्षेत्रात ओबीसी संघटनेच्या माध्यातून समाजकार्य सुरु असून पवार समाजाच्या राष्ट्रीय कार्यकारीणीचे माजी संघटन सचिव राहिले आहेत.

२०२१, २२ व २३ च्या पुरस्कार निवडीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या अध्यक्षतेखालील पुरस्कार निवड समिती गठीत करण्यात आली होती. या समितीत पत्रकार पराग करंदीकर, संदीप भारंबे, रवींद्र बेडकींहाळ, जितेंद्र दोशी,स्वप्नसौरभ कुलश्रेष्ठ, सईद अन्सारी, चंद्रकांत शिंदे, निलेश खरे, सम्राट फडणीस व संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) डॉ.गणेश मुळे यांचा समावेश होता.

# राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेचे अधिवेशन व शपथग्रहण सोहळा थाटात

## कार्यक्रमात मालवा क्षेत्र, वर्धा तटीय क्षेत्र व वैनगंगा तटीय क्षेत्रातील पोवार व भोयर पोवार समाजाची उपस्थिती

### -समाजातील कर्तृत्वान व्यक्तींचा राजाभोज समाज रत्न पुरस्काराने सन्मान




**गोंदिया**- पवार प्रगतिशील मंच गोंदिया व प्रगतिशील शिक्षण संस्था गोंदियाच्या संयुक्त विद्यमाने व सहकार्याने राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेच्या पदाधिकाऱ्यांचे शपथग्रहण, अधिवेशन, सन्मान सोहळा व आमसभेचे सफल आयोजन दिनांक २२ जून रोजी येथील पोवार बोर्डिंग, कन्हारटोली येथे करण्यात आले होते. यावेळी विविध कार्यक्रमांसह उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीचा राजाभोज समान रत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बालाघाट क्षेत्राच्या खासदार भारती पारधी, तिरोडा- गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले, मध्यप्रदेश शासनाचे माजी मंत्री गोरीशंकर बिसेन, माजी खासदार बोधसिंग भगतब, आमदार गौरव पारधी, माजी आमदार ओंकार बिसेन,खोमेश्वर रहांगडाले, गोंदिया पं.स. सभापती मुनेश रहांगडाले, माजी जिल्हा पंचायत अध्यक्षा अनुसूईया बिसेन, मीना बिसेन, राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेचे माजी अध्यक्ष इंजि.टी डी बिसेन, इंजी.मुरलीधर टेंभरे, सरीताताई गोखरे, पुष्पा निरंजन बिसेन, पवार प्रगतिशील मंचचे अध्यक्ष यू.टी. बिसेन, प्रगतिशील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश भक्तवर्ती उपस्थित होते.

कार्यक्रमात राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेच्या महासचिवद्वारे विविध प्रस्ताव सादर करून प्रस्ताव पारीत करण्यात आले. याप्रसंगी महासभेच्या पदाधिकाऱ्यांचे शपथग्रहण सोहळा पार पडला.यावेळी मालवा क्षेत्र, वर्धा तटीय क्षेत्र व वैनगंगा तटीय क्षेत्रातील पोवार व भोयर पोवार समाजातील नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती. याप्रसंगी राष्ट्रीय पवार महासभेचे माजी अध्यक्ष व संरक्षक, भोयर पवार महासंघाचे अध्यक्ष, पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित हेमेंद्र सिंह पवार, भूमी दाता दानवीर स्वर्गीय देऊभाऊ तुरकर यांचे पूत्र धनंजय तुरकर, सिविल सर्जन डॉ. पुरुषोत्तम पटले, खअड परीक्षा पास करणारे पंकज पटले, सचिन बिसेन यांचा राजाभोज समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

शपथग्रहण कार्यक्रमात महासभेची वरिष्ठ कार्यकारिणी, महिला अध्यक्ष केसर बिसेन व कार्यकारिणी, युवा अध्यक्ष दारासिंह कटरे व कार्यकारिणी, संयोजक यशवंत शरणागत व राष्ट्रीय महासभा संस्कृती, परंपरा, रितीरिवाज व भाषा बोली संरक्षण परिषद, हेमेंद्र क्षीरसागर व कार्यकारिणी राष्ट्रीय महासमा युवा संवाद व नवाचार परिषद, तुफानसिह पारधी व कार्यकारिणी राष्ट्रीय महासभा सामाजीक इतिहास व अनुसंधान परिषद, तपन राजा चौधरी व कार्यकारिणी राष्ट्रीय महासभा भारतीय प्रवासी परिषद यांच्यासह गोंदिया येथून महासभेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी प्रा. किशोर भगतब, सचिव पदी सुरेश पटले, महासभेच्या राष्ट्रीय युवक कार्यकारिणी उपाध्यक्षपदी प्रा. लिलेश्वर रहांगडाले, संघटन सचिवपदी भागचंद रहांगडाले, दिलीप पारधी, छत्रपाल चौधरी, योगी येडे, राज रहांगडाले, राहुल बिसेन, महिला समितीच्या सचिवपदी रश्मी रहांगडाले उपाध्यक्ष पदी मंजुषा हरीणखेडे यांच्यासह दिव्या तुरकर, मेघा बिसेन यांना शपथ देवून नियुक्तीपत्र देण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पवार प्रगतिशील मंच गोंदिया, प्रगतिशील शिक्षण संस्था गोंदिया चे सर्व पदाधिकारी, राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदलाल चौधरी दुर्ग, उपाध्यक्ष बसंत बिसेन रापपुर, जीयालाल शरणागत नागपुर, खिलेंद्र टेंभरे बेहर, राष्ट्रीय महासचिव अर्पण बीसेन सिवनी, राष्ट्रीय कोशाध्यक्ष ठाकरे, राष्ट्रीय संघटन सचिव पप्पू पटले गोंदिया यांनी सहकार्य केले.

# प्रकल्प कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या रद्द करा, अन्यथा आंदोलन

- महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाची मागणी : आयुक्तांना दिले निवेदन
- विद्यार्थी संख्या असतील, तिथे तीनच स्वयंपाकी असतील तर अडचण होईल

**गोंदिया:**-आदिवासी विकास विभागाद्वारे चालविल्या जाणाऱ्या संपूर्ण महाराष्ट्रात एकूण ४९९ शासकीय आश्रम शाळा सुरू असून, आश्रम शाळेमधील विविध कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या वरिष्ठ कार्यालयात आहेत. विद्यार्थ्यांच्या केलेल्या परिणामी शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. यासाठी प्रतिनियुक्त्या तत्काळ रद्द करून आश्रम शाळेवर शिक्षक, कर्मचारी परत पाठविण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाने आयुक्तांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

आश्रम शाळांमध्ये संपूर्ण महाराष्ट्रात ज्या ठिकाणी एक ते सात वर्ग आहेत तेथे तीन स्वयंपाकी व एक ते बारा वर्ग आहेत तेथेही फक्त तीनच स्वयंपाकी पदं मंजूर केलेले आहेत. हे न उलगडणारे कोडे आहे. संपूर्ण विद्यार्थ्यांचा दोन वेळचा स्वयंपाक व दोन वेळचा नाश्ता तीनच स्वयंपाकी कसे तयार करतील, असा प्रश्न आहे.

तीन स्वयंपाकीचे पद हे ज्या आश्रम शाळांमध्ये सेंट्रल किचनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नाश्ता व जेवणाचा पुरवठा केला जातो, त्या आश्रम शाळांसाठी हा नियम लागू होतो, परंतु या विभागातील नवीन आकृतीबंध तयार करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे सपशेल दुर्लक्ष केले. जिथे ५० विद्यार्थी असतील, तिथे ३ स्वयंपाकी व जेथे ५०० विद्यार्थी संख्या असतील, तिथेही तीनच स्वयंपाकी असतील, यामुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे.

### प्रवेशोत्सवासाठी निधी कधी देणार

**प्रवेशोत्सवाच्या दिवशी विविध उपक्रम राबविण्यात यावे, यासाठी परिपत्रकाद्वारे कळिवले आहे, परंतु त्यासाठी लागणारी रक्कम विभागाकडून मुख्याध्यापकांना दिली नाही. महाराष्ट्र राज्यातील एकमेव कर्मचारी मुख्याध्यापकच असा आहे की, आपल्या वेतनातून वर्षभर शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, देखभालीसाठी स्वतःच्या वेतनातून रक्कम खर्च करीत असतो. नंतर अनुदान आल्यावर ती रक्कम मिळते.**

### विज्ञान शिक्षकांची पदे रिक्त

**विज्ञानातून शिक्षण अशी संकल्पना शिक्षण विभागाने आखली असून, पहिली ते बारावीपर्यंत विज्ञानाचे वर्ग असलेल्या आश्रम शाळेत विज्ञान शिक्षकाचे पद मंजूर असूनही भरले नाही. प्रयोगशाळा सहायक पद मंजूर असूनही रिक्त आहे. त्यामुळे आदिवासी विद्यार्थी हा कसा विज्ञाननिष्ठ होईल. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करून यातील त्रुटी दूर करण्याची मागणी मुख्याध्यापक संघाने निवेदनातून केली आहे.**

कंत्राटी कर्मचारी ही संकल्पना आश्रम शाळेला लागू होऊच शकत नाही, कारण आश्रम शाळा या निवासी स्वरूपाच्या आहेत. चार बहुउद्देशीय कर्मचारी प्रत्येक शाळेत असून, शाळेवर किमान १० ते १५ बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांची गरज असते. आश्रम शाळांमध्ये शिपाई, गेट किपर, सफाईगार, रात्रपाळी चौकीदार, लिपिक, प्रयोगशाळा सहायक, असे विविध पदे रिक्त आहेत.

## संपादकीय

# अरण्यातले वनऋषी

ज्येष्ठ साहित्यिक आणि अरण्यऋषी असे ज्यांना आदराने नाव दिलेले होते असे मारूती चितमपल्ली यांना वयाच्या ९३ व्या वर्षी देवाज्ञा झाली. ९३ वर्षे हे काही लहान–सहान आयुष्य नव्हे. पण त्या आयुष्यात हा माणूस पक्षी आणि प्राण्यांचा मित्र होता आणि त्यांचा अभ्यासक होता. त्यासाठी त्यांनी वनक्षेत्रपाल नोकरी करत असताना आपले आयुष्य या आपल्या मुक्या मित्रांसाठी वेचले आणि लोकांना प्राणी आणि पक्ष्यांची महती सांगितली. नुसती सांगितलीच नव्हे तर लोकांमध्ये आवड निर्माण व्हावी म्हणून काम केले. त्यांना अरण्यऋषी म्हटले गेले. पण ते खरोखरच अरण्यातील तपस्वी होते आणि त्यांनी या आपल्या मुक्या मित्रांसाठी आयुष्यभर खूप काही केले आणि त्यांचा अभ्यास केला. चितमपल्ली यांनी अनेक पुस्तके लिहिली आणि त्यांचे मचकवाचांदणफअसो किंवा मनवेगाव बांधचे दिवसफअसो, जंगलातील एक विलक्षण अनुभूती देते. चितमपल्ली यांनी लौकिकार्थाने वानिकी विद्या शिकून सरकारी नोकरी केली आणि अखेरपर्यंत ते वन्य जीवांसाठी जगले. सोलापूर येथे जन्मलेले चितमपल्ली यांनी आपले उर्वरित जीवन विदर्भात घालवले आणि विदर्भातील जंगलांत त्यांनी आयुष्यातली उमेदीची वर्षे घालवली. त्यांनी केवळ वन खात्यात नोकरी केली नाही, तर संस्कृत पाठशाळेत अध्ययनही केले आणि जर्मन आणि रशियन भाषांचा अभ्यासही केला. पण त्यांचे जीवन वनाधिकारी म्हणून कार्य करण्यासाठी वेचले आणि त्यात त्यांनी महाराष्ट्राला जंगल वाचायचे कसे हे शिकवले.

कनार्ळा पक्षी अभयारण्य, मेळघाट प्रकल्प आणि नवेगाव येथील प्रकल्पांच्या विकासात त्यांचे योगदान आहे. पण त्यांची ओळख आहे ती म्हणजे निसर्ग आणि पर्यावरणाशी नाळ जोडलेला माणूस म्हणून आणि हीच त्यांची ओळख शेवटपर्यंत कायम होती. चितमपल्ली यांच्या आईने त्यांना प्रथम जंगलावर प्रेम करायला शिकवले. १९६० मध्ये महाराष्ट्रात त्यांची वनाधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यावर त्यांनी महाराष्ट्रातील जंगलाचा अभ्यास केला आणि इतरांनाही शिकवला. त्यांचे पहिले वनाधिकारी म्हणून दशक कोकणात गेले, ज्यावेळी तेथे कोणतेही राष्ट्रीय उद्यान अथवा अभयारण्य नव्हते. पण त्यांचा अभ्यास आणि निसर्गाचे वाचन खरे सुरू झाले ते नवेगाव येथे नियुक्ती झाल्यावर आणि तेथील माधवराव पाटील यांना भेटल्यावर. त्यांनी साहित्यात ही सारी पात्रे अजरामर केली आहेत. माधवराव पाटील हे तर साधे शिकारी होते. पण त्यांना या अरण्यऋषीचा सहवास घडला आणि ते जंगलाचे अभ्यासक बनले. महाराष्ट्रातील रहिवाशांमध्ये जंगले लोकप्रिय करण्याचे श्रेय निःसंशय चितमपल्ली यांच्याकडेच जाते. कारण त्यांच्यामुळेच आज लोक जंगलाकडे वळले आहेत आणि लोकांत जंगले पाहण्याची आवड निर्माण झाली आहे. साहित्यिक म्हणून त्यांचे श्रेय प्रचंड आहे आणि त्याचे पहिले पुस्तक मपक्षी जाय दिगंतरा.फ हे आले तेव्हा ते बेस्ट सेलर ठरले. तेव्हा हा कोण नवीन लेखक आला आहे असा प्रश्न मान्यवर साहित्यिकांना पडला होता. नंतर चितमपल्ली हे सर्वपरिचित झाले आणि ते महाराष्ट्रात लोकप्रिय लेखक बनले. त्यांच्या पुस्तकांनी नवीन शैली सुरू केली आणि नवीन लेखकांना प्रोत्साहन दिले असे तज्ज्ञांचे मत आहे. हा माणूस कायम जंगलात वास्तव्याला असायचा आणि त्यामुळे त्यांचे जीवन जंगलातील हवेने, तेथील ताज्या घटनांनी समृद्ध झालेले होते आणि त्यांच्या नियमित परिघाला समृद्ध करणारा अनुभव देणारा लेखक जन्माला आला होता.

साहित्यिक या दृष्टीने चितमपल्ली यांचे जीवन, लेखन आणि अनुभव हे इंग्रजी लेखकाच्या जवळ जातात. कित्येक नामवंत लेखक असे आहेत की, त्यांनी आपल्या लेखनासाठी चाकोरीतील आयुष्य सोडले आहे आणि नवीन आयुष्य सुरू केले. चितमपल्ली त्यातच गणले जातात. त्यांनी आयुष्यभर जंगलातील माणूस म्हणून जगण्यात समाधान मानले आणि तरीही त्यांनी कधीही कमीपणा मानला नाही. चितमपल्ली यांनी महाराष्ट्राला जंगल वाचायला शिकवले असे जे म्हटले ते या अर्थाने. ते कित्येक वेळा पक्ष्यांच्या जीवनक्रमाचा अभ्यास करत असत आणि त्यांच्या नोट्स घेत असत. त्यातून त्यांची अनेक पुस्तके जन्माला आली. चितमपल्ली हे सरकारी नोकरी करत राहून व्रतस्थ होते आणि त्यांनी पक्षी कोश लिहिला तेव्हा त्यात ४०० हून अधिक पक्ष्यांचा त्याच्या स्थलांतराचा अभ्यास त्यात आहे. त्यांची एक खंत होती ती म्हणजे आजचे वनपाल पुरेसे निरीक्षण करत नाहीत आणि नोंदी घेत नाहीत. कित्येक वनपाल तर केवळ टाकणे याच एका हिशोबात काम करत असतात. अर्थात चितमपल्ली यांना जे पाहिजे होते ते आज कुणीही करणे शक्य नाही. कारण आज जो तो पगार आणि आपण इतकेच पाहत असतो. त्यामुळे चितमपल्ली खंत घेऊन गेले हे त्यांचे प्रारब्धच होते. महाराष्ट्रातील जंगलात ३६ वर्षे वास्तव्य करून अत्यंत समृद्ध अनुभव गाठीशी बांधून चितमपल्ली आज आपल्यात नाहीत. चितमपल्ली यानी केवळ जंगलावर पुस्तके लिहिली आहेत आणि त्यात मरानवाटाफ जसे आहे तसेच मरातवाफ आणि कितीतरी आहेत.

सोलापूरमध्ये झालेल्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. तरुणालाही लाजवेल अशा पद्धतीने आणि तडफफेने काम करण्याची त्यांची प्रवृत्ती होती. त्यांनी मपक्षी कोशफ लिहिला तसेच मवृक्ष कोशफ लिहिण्याचे त्यांचे काम अर्धवट राहिले. अरण्य वाचन आणि सतत कार्यरत राहणारा ऊर्जावान असा हा लेखक होता. पण आज त्यांचा जीवनप्रवास काळाने संपवला आहे. त्यासाठी लागणारी माहिती मिळवण्यासाठी वाट्टेल ते कष्ट करण्याची तयारी त्यांची होती. त्यामुळे मपक्षी कोशफ त्यांच्याकडून लिहून झाला. त्यांच्या पुस्तकात प्राणी जीवनाबद्दल मनोरंजक माहिती आहे. चितमपल्ली यांच्या मते अनेक वृक्ष पावसाचे संकेत देतात. बिब्याच्या झाडाला फुले लागली, तर त्या भागात दुष्काळ पडतो असे त्यांचे निरीक्षण होते. असे अनेक मनोरंजक, निरीक्षण आणि ज्ञान त्यांच्या लेखनात होते. चितमपल्ली यांना भावपूर्ण श्रद्धांजली. चितमपल्ली यांच्यासारखे लोक आता होणार नाहीत. हा ठेवा आहे. तो काळाने न मागता आपल्याला दिला होता आणि न सांगता नेलाही.

## सटवा येथे भजन कीर्तनासह वाजतगाजत जेसीबी मधून करण्यात आले नवागतांचे स्वागत



**गोरेगांव:** – तालुक्यातील सटवा येथे आज २३ जून रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी भजन किर्तनासह डफफलीच्या आवाजात वाजतगाजत प्रभातफेरी काढून जेसीबी मध्ये बसवून नवागताचे स्वागत करण्यात आले.

जिल्ह्यात शाळेची घंटा आज २३ जून रोजी वाजली. वरिष्ठ पातळीवरूनही नवागताचे स्वागत करून शाळा प्रवे–शोत्सव करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच अर्चना रमेश ठाकूर, पोलिस पाटील टिकाराम रहांगडाले, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेंद्र रहांगडाले, तंटामुक्त समिती अध्यक्ष रवींद्र कटरे, उपसरपंच विनोद पारधी, माजी सरपंच रमेश ठाकूर, मुख्याध्यापक त्रिलोक चौधरी यांच्या नेतृत्वात शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. सर्व नवागताचे स्वागत करून त्यांना जेसीबी मध्ये बसवून गाव भ्रमंती करण्यात आली. यावेळी पारंपरिक वाद्य डफफली सह भजन कीर्तनाच्या माध्यमातून शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य ओमेंद्र ठाकूर, संजय कटरे, गणराज रहांगडाले, तेजराम रहांगडाले, राजेंद्र ठाकूर, दिलीप रहांगडाले, भागवत बिसेन, सुखराम ठाकूर, नत्थु रहांगडाले, कपूरचंद पारधी, गिरधारी कोल्हे, नानू रहांगडाले, नानाजी रहांगडाले, अंबर चौधरी, गोधन बाई कटरे, संजय रहांगडाले, सहायक शिक्षक रूपेश बिसेन यांच्यासह गावातील इतर नागरिक, पालक मंडळी व शाळेतील शिक्षक उपस्थित होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# नवेगावबांध आणि मित्र माधवराव पाटील!





गोंदिया:– ज्येष्ठ पक्षीतज्ज्ञ पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचे निम्मे आयुष्य हे नवेगावबंधच्या सानिध्यातच गेले. नवेगावबांध परिसरातील जंगल आणि नेहमी मदतीसाठी सोबतीला असलेले मित्र धाबेपवनीचे माधवराव पाटील डोंगरवार हे त्यांच्या आयुष्यात केंद्रस्थानी होते.

मारुती चितमपल्ली हे १९७३ मध्ये नवेगावबांध येथे वनाधिकारी म्हणून रुजू झाले होते. त्यावेळी नवेगावबांध वनविभागाचा परिसर हा जैवविविधतेसह विविध पक्ष्यांच्या किलबिलाटाने गजबजणारा असा होता. जंगलातील प्रत्येक भागाची, रस्त्याची माहिती देणारे धाबेपवनीचे माधवराव पाटील डोंगरवार हे त्यांचे जवळचे मित्र होते. त्यामुळे आजूबाजूच्या लोकांनाही ते माधवराव पाटील यांच्या कुटुंबातीलच सदस्य असल्यासारखे वाटायचे. १९७३ पासून सलग सहा वर्षे येथे कार्यरत होते. आदिवासींच्या माध्यमातूनच त्यांनी जंगल वाचवले. त्यांच्या सोबतीने विकास केला. आदिवासींकडे परवाना नसलेल्या बंदुका होत्या. त्यांनी ते शिकार करायचे. आदिवासींना जगंल व प्राण्यांप्रती जागृत केल्यानंतर आदिवासी नागरिकांनी आपल्याकडील ३६ बंदुका मारुती चितमपल्लीकडे सोपविल्या होत्या. चितमपल्ली नवेगावबांधच्या जंगलाची माहिती देणारे, रस्ते दाखविण्यासोबतच त्यांच्या सोबतीला राहणारे आदिवासी समाजातील माधव, सदा, निरगु, भिवाढिवर, झोलबा हे सर्व त्यांच्या आयुष्यात महत्वाचे ठरले. त्यांच्याकडूनच जंगलाची माहिती घेतली. त्यांच्याबद्दल त्यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे. पक्षी



व प्राण्यांकरिता नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानाची निर्मिती नेहमीच आठवणीत राहणारी आहे.

### नवेगावला राष्ट्रीयस्तरावर ओळख

मारुती चितमपल्ली यांनी नवे–गाव राष्ट्रीय उद्यान आणि जलाशय परिसरात दीर्घकाळ निसर्ग अभ्यास केला. माधवराव पाटील डोंगरवार व गोंड बांधवांच्या सहकायांने त्यांनी जंगलातील जैवविविधता आणि स्थलांतरित पक्ष्यांचा सखोल अभ्यास केला. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी नवेगावबांधमध्येच वास्तव्य करून प्रसिद्ध मपक्षीकोशफ तयार केला आणि नवेगावबांधचे नाव राष्ट्रीयस्तरावर पोहोचवले. त्यांच्या कार्यामुळे नवेगावबांधची निसर्ग पर्यटन आणि पर्यावरणीय अभ्यासाच्या दृष्टीने एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

### चितमपल्लींचे निसर्गबंध

नांदेडनजीकच्या मुक्कामात त्यांनी सटवा आंध या आदिवासी तरुणाशी घट्ट मैत्री केली. अंगात अर्धी चड्डी आणि मळका अंगरखा घातलेला आंध अवघड झाडावर वानरासारखा झरझर चढायचा. कपारीआड दडलेल्या गुहेत लीलया डोकावणे हे त्याचे नित्याचे काम. त्याच्या सोबतीने पैनगंगेकाठच्या जंगलात चितमपल्ली रात्रंदिवस फि रले. त्याच परिसरात उंच कडेवरील नदीशेजारच्या दरडीची उत्कंठावर्धक गोष्ट त्यांच्या आत्मकथनात आली आहे. त्यांचा आवडता टॉमी हा कुत्रा त्यांनी याच ठिकाणी गमावला. अवघड, अंधारल्या कपारीत एक घरटे होते. खाली खोल नदी, एका पक्ष्याने रानचिमणीचा खोपा लुबाडून आणला होता. तो डोकावून बघतानाच त्यांची हॅट सपकन उडवल्यागत नदीत जाऊन पडली. टॉमीने क्षणार्धात हॅटच्या मागोमाग नदीत उडी मारली. डोक्यावरील हॅट घुबडाने धक्का दिल्याने उडाली हे समजताच ते शहारले. घुबडाने माणसाचे डोळे फोडल्याची अनेक उदाहरणे ठाऊक असल्याने चितमपल्लींनी दोन्ही हात डोक्यावर गच्च धरले. सटवा ओरडून घुबडाला हुसकावण्याचा प्रयत्न करू ला–गला.

खाली टॉमीला नदीतील सु–सरीने पकडले. ती त्याला ओढत पाण्याखालो घेऊन गेली. त्यानंतर चितमपल्लींनी कधीही कुत्रा पाळला नाही. सहस्रकुंडच्या डोहात मोठ्या सुसरी आणि कासव असल्याचे कळाले असतानाही भर डोहात सूर मारण्याचा मपराक्रमफ चितमपल्लींनी राम शेवाळकरांसह केला होता. घुबडाच्या धक्क्याने तोल गेला असता, तर पैनगंगेत जलसमाधी लाभण्याचीच भीती होती. अशा जिवंत प्रसंगांनी चितमपल्लींचे निसर्गबंध अधिकच दृढ केले.

# देवरीचा अक्षद आचले एस.टी.गटातून राज्यात पहिला



**देवरी :**– निचित केलेले ध्येय गाठायचे असेल तर त्यागाशिवाय पर्याय नाही,हे अक्षद आचले या विद्यार्थ्याने स्वतःच्या कृतीतून सिद्ध केले आहे. मूळचा गोंदिया जिल्ह्यातील देवरीचे येथील रहिवासी असलेला अक्षद किशोरी आचले अकोल्यात राहून ङ्गनीटफ्ची शिकवणी करीत होता. मागील दोन वर्षांत तो गावाला गेला नाही आणि सोशल मीडियावरही त्याने वेळ गमावला नाही. केवळ अभ्यास अनब अभ्यास तोही सातत्यपूर्ण आणि जिद्दीने करीत अखेर त्याने आपले ध्येय गाठले. नुकत्याच लागलेल्या ङ्गनीटफ परीक्षेच्या निकालात त्याने अनुसूचित जमाती गटातून राज्यात पहिला येण्याचा बहुमान पटकावला तर देशात त्याची १० वी रैंक आहे.

या यशस्वी वाटचाली बाबद अक्षद आचले म्हणतो की, मी मूळचा गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथील रहवासी असून दहावी पास झाल्यानंतर नीटच्या तयारीसाठी माझ्या वडिलांनी अकोल्याला पाठविले. या दरम्यान मी दिवाळी वगळता गावीही गेलो नाही. तसेच सोशल मीडियाच्या मोहजालापासून दूर राहिलो. माझे वडील गोंदिया जिल्ह्यातील देवरी पंचायत समिती मध्यवर्ती कृषी विस्तार अधिकारी आहेत. दोन वर्षांपूर्वी मोठ्या भावालाही वडिलांनी नीट करायचे असल्याने कोचिंग क्लाससाठी अकोल्याला पाठविले होते. तोही यशस्वी झाला असून, सध्या मुंबई येथे जे.जे. महाविद्यालयात शिकत आहे. अक्षद आचले हा दहावी झाल्यानंतर नीटच्या तयारीसाठी अकोल्याला आला. अकरावी, बारावीसाठी प्रवेश घेतला. अकोल्यात त्यांनी खोली केली. आणि प्रा. ललित काळपांडे यांच्या मार्गदर्शनात आणि त्यांच्या सूचनेप्रमाणे अभ्यास करीत राहिलो. क्लास व्यतिरिक्त मी दररोज किमान सहा ते सात तास सातत्याने अभ्यास केला. लायब्ररीमध्येच मी अभ्यास करीत होतो.

या दरम्यान शेकडो प्रश्नपत्रिका मी सोडवल्या. विशेष म्हणजे दोन वर्षांच्या काळात गावाला जाणे, तिकडे काही काळ राहणे, असे दिवाळी वगळता कधी झाले नाही. प्रा.ललित काळपांडे सरांना माझ्यावर विश्वास होता की माझा निकाल चांगला येईल. त्यांचा विश्वास सार्थ करण्यासाठी मी सुद्धा अभ्यासामध्ये कोणतीच कसर ठेवत नव्हतो.

निकाल आल्यानंतर आणि त्यातही मी माझ्या अनुसूचित जमाती (एसटी) गटातून राज्यातून पहिला आल्याची बातमी ऐकताच आनंद गगनात मावत नव्हता. आई–वडीलही खूष झाले आ–हेत. माझी आधीपासूनच डॉक्टर होण्याची त्यातही बालरोग तज्ज्ञ होण्याची इच्छा असून, अंतिम निर्णय अभ्यासक्रमा दरम्यान घेणार असल्याचेही अक्षद आचले म्हणाला. कठोर परिश्रमाने अक्षदने आपली गुणवत्ता सिद्ध करीत जीवशास्त्र ३४६, रसायनशास्त्र १५४ आणि भौतिकशास्त्रात ९७ असे एकूण ५९७ गुण मिळवले आहेत.

# २०१ लाभार्थी मुलींना मुदत ठेव प्रमाणपत्र वितरित

**गोंदिया:**– समाजात स्त्री भ्रूणहत्याचे प्रमाण कमी व्हावे, मुलींचा जन्मदर वाढावा, मुलींच्या सामाजिक व शैक्षणिक विकासाला हातभार लागावा, या उद्देशातून महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालकल्याण विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या सुधारित माझी कन्या भाग्यश्री योजनेचे मुदत ठेव प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम शुक्रवारी (दि.२०) पंचायत समिती सभागृहात घेण्यात आला.

अध्यक्षस्थानी पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार विनोद अग्रवाल उपस्थित होते. याप्रसंगी एकात्मिक बालविकास सेवा योजना, प्रकल्प गोंदिया–१ कार्यक्षेत्रातील १४० व प्रकल्प गोंदिया–२ कार्यक्षेत्रातील ६९, अशा एकूण २०९ पात्र लाभार्थी मुलींना २५ हजार रूपयांचे मुदत ठेव प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. याप्रसंगी पंचायत समिती उपसभापती शिवलाल जामरे, बालविकास प्रकल्प अधिकारी शीतल लाडके,



प्रियंका किरणापुरे आदी मान्यवर उपस्थित होते. संचालन करून प्रास्ताविक विस्तार अधिकारी तीर्थराज उके यांनी मांडले. कार्यक्रमासाठी एकात्मिक बालविकास सेवा योजना, प्रकल्प गोंदिया १ व २ कार्यालयातील सर्व अधिकारी–कर्मचारी, अंगणवाडी बीट पर्यवेक्षिका व अंगणवाडी सेविकांनी सहकार्य केले

# शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

**गोंदिया:**– गोंदिया जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये आजप–ासून नवीन शैक्षणिक वर्षाला उत्साहात सुरुवात झाली. ऐकोडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेशोत्सव पार पडला.

शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी शाळेने विशेष सजावट केली होती. रंगीबेरंगी फुगे, आकर्षक रांगोळी, फुलं आणि गोडधोड पदार्थांची व्यवस्था करण्यात आली होती. नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ, टिळा आणि मिठाई देऊन करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले आणि नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शाळेची आवड वाढवण्यासाठी प्रेरणा दिली. शाळ–ेतील शिक्षकांनी गावातून फेरी काढून विद्यार्थ्यांना शाळेच्या दिशेने मार्गस्थ केले, काही शाळांमध्ये पालकांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रमाव्दारे विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.



शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी उत्सुकता निर्माण व्हावी यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. जिल्ह्यातील सर्वच शाळांमध्ये प्रवेशोत्सव आनंदमय आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

या उपक्रमात रमणलाल ताजने, मंजू उईके, आशा हिरणखेडे यामिनी बनसोड, अरुण बिसेन, शालू चौधरी, अश्विनी पटले, अजबराव रीनायत यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, ग्रामस्थ यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.



# व्ही.पी.सिंग:मूल्याधिष्ठित राजनीतीचे महानायक

'तत्त्वनिष्ठेची जपणूक' या सोमनाथ चटर्जी यांच्या आत्मचरित्रात ते म्हणतात की, व्ही.पी.सिंग हे मूल्याधिष्ठित राजकारणाचे तसेच सामाजिक न्यायाचे प्रतिक होत. प्रधानमंत्री व्ही.पी.सिंग हे सर्वसहमती, मूल्याधिष्ठित राजकारण आणि सामाजिक न्यायाचे प्रतीक होते. भारतीय समाजात न्याय आणि निति मूल्ये यांना अत्युच्च स्थान आहे. न्याय नितीचे अधिष्ठान असलेले तत्त्वज्ञान शिरसावंद्य मानले जाते. महत्त्म लोकांच्या हितार्थ निती मूल्यांसाठी संघर्ष करणारी अवैदिक परंपरा प्रदीर्घकाळ राहिलेली आहे. ती आजही कायम आहे. वैदिकांच्या कूर अमानवी जुलमी व्यवस्थेविरुद्ध लढत असताना अवैदिक योद्ध्यांनी किंचितही मानवी नीतिमूल्ये ढळू दिली नाहीत. याचे असंख्य दाखले अगदी प्राचीन काळापासून मिळतात.

बळीवंशातील सर्वच राजे या बाबतीत फार फार वेगळे होते. स्वकीय जनांच्या सुखासाठी शत्रूंशी झगडताना आपल्या प्राणांसह आपले सर्वस्व लुबाडले–ओरबडले गेले तरी त्याची पर्वा करायची नाही, ही त्यांच्या जगण्याचीही आणि मरण्याचीही रीत होती. त्यांना सत्ता नको होती असे नाही, परंतु आपली सत्ता विशिष्ट तत्त्वज्ञानावर, नीतिमूल्यांवर, जीवनदर्शनावर उभी असली पाहिजे, याची पुरेपूर काळजी ते घेत होते. त्यांनी आपल्या हाताने आपल्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा विसर्जित केल्या असत्या आणि आक्रमक आर्य आपल्यापेक्षा वरचढ होत आहेत म्हटल्यावर त्यांच्यापुढे शरणागती पत्करली असती, तर त्यांच्या इतक्या पिढ्यांना आपले प्राण गमवावे लागले नसते. त्यांनी स्वतःच वैदिकांच्या रंगात रंगून जायचे ठरविले असते, तर आर्यांचे मांडलिक म्हणून ते सुखेनैव जगू शकले असते आणि त्यांनी टाकलेल्या सत्तेच्या छोट्यामोठ्या तुकड्यांवर पोट भरण्यासाठी लाळ घोटत सुखी राहू शकले असते. परंतु त्यांच्यापैकी कोणीही आत्मद्रोहाचा हा मार्ग पत्करला नाही. त्यांच्या सैन्यातील व प्रजेतील काही व्यक्तींनी वा गटांनी गद्दारीचा मार्ग स्वीकारला, हे खरे आहे. परंतु हिरण्याक्षापासून बाणापर्यंत कोणीही आपल्या जीवनमूल्यांपेक्षा आपल्या प्राणांना अधिक महत्त्व दिले नाही, मग त्यांच्याकडून जीवनमूल्यांपेक्षा सत्तेला अधिक महत्त्व दिले जाण्याची शक्यता तर फार दूरची झाली. अगदी जीवघेण्या संघर्षांतही त्यांची हृदये स्वच्छ आणि मस्तके ताठ राहिली. त्यांच्या पद्धतीने जगणे हे तर खरे जगणे आहेच, पण त्यांच्या पद्धतीने मरणे हे देखील जीवनाचा झेंडा उंच उंच फडकविण्यासारखे आहे! (पृ. १४६–४७, बळीवंश, ले. डॉ आ ह साळुंखे) बळीराजा आणि बळीवंशातील ही नितीमूल्ये व्ही.पी.सिंगांनाही आपलीशी वाटावी यातच नीतीमूल्यांची यथार्थता दडलेली आहे. एका राजकीय अस्थिर परिस्थितीत लोकसभा त्रिशंकू असताना व्ही.पी. सिंग सरकार स्थापन झाले.

जनता दलाच्या पुढाकाराने राष्ट्रीय आघाडी सरकारला बेभरवशाच्या भाजपचे बाहेरुन समर्थन. अशा परिस्थितीत सरकार अकराच महिने तरले. पण अनेक क्रांतिकारक निर्णय घेत व्ही.पी.सिंग सरकार भारतीय राजकारणाच्या इतिहासात अविस्मरणीय ठरले. व्ही.पी.सिंगांनी मंडल आयोग लागू केला तेव्हा फार तणावग्रस्त स्थिती होती. एकीकडे मंडलची मागणी जोर धरत होती. व्ही.पी.सिंगांसोबतची मंडळी मंडल समर्थनार्थ तगडी होत होती. व्ही.पी.सिंग ज्या राष्ट्रीय आघाडीचे नेतृत्व करीत तिच्या जाहीरनाम्यात मंडल आयोग ओबीसींसाठी सवलती देण्याची मागणी होती. त्यामुळे व्ही.पी.सिंगांना मंडल आयोगाची अंमलबजावणी करणे ही मोठी कामगिरी पार पाडणे आव्हानात्मक होते. तर त्यांच्या सरकारला पाठिंबा असलेला भाजप आरक्षणाविरोधात असल्याने सरकार डळमळीत होण्याची शक्यता होती.

भाजपाने मंदिर–मस्जिदचा मुद्दा उकरुन काढला आणि मंडलच्या वातावरणाला गढूळ करून टाकले. व्ही.पी.सिंग यांनी मंडल लागू करू नये यास्तव ही कावेबाज चाल होती. सरकार पडण्याची तमा न बाळगता व्ही.पी.सिंग यांनी मंडल आयोग लागू केला. मंडल आयोग लागू केल्याबरोबर व्ही.पी.सिंगांवर प्रचंड टीका होऊ लागली. व्ही.पी.सिंगांना राक्षसाची उपमा देऊन आरक्षण विरोधक तुटून पडू लागले. इलेक्ट्रॉनिक्स मीडिया व प्रिंट मीडिया यांनी व्ही.पी.सिंगांवर अतोनात तोंडसुख घेतले. विश्वनाथ प्रताप सिंगांची प्रतिमा संपूर्णतः खलनायकाची रंगवण्यात तसूभरही कसर ठेवली नाही. ओबीसीचा मसिहा व्ही.पी.सिंग प्रचंड दुःखी अंतःकरणाने पण धीरगंभीरपणाने ही परिस्थिती पहात होते. राजकीय अस्थैर्य आणि तणाव दिसून येत होता. पण व्ही.पी.सिंगांनी मंडलची घोषणा मागे घेतली नाही.

व्ही.पी.सिंग काही मुस्लिम नव्हते. बौद्ध, जैन, पारशी अथवा ख्रिश्चन नव्हते. हिंदुविरोधीही नव्हते. ते हिंदू राजपूत होते, आणि बहुसंख्य मागास हिंदु असलेल्या ओबीसींच्या उत्कर्षासाठी भारतीय संविधानात अनुस्यूत असलेल्या कलम ३४० अन्वये स्थापित मंडल आयोग त्यांनी लागू केला होता. काय गुन्हा होता हा? की व्ही.पी.सिंगांना खलनायक, रावण, राक्षस ठरविण्यात आले होते. हे तेच व्ही.पी.सिंग होते ज्यांनी राजीव गांधींच्या काळातील बोफोर्स प्रकरणातील गैरव्यवहार चव्हाट्यावर आल्यानंतर नैतिक जबाबदारी म्हणून भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या मंत्री मंडळातून, मंत्रीपदाचा राजीनामा देऊन बाहेर पडले. स्वच्छ प्रतिमेचे नायक बनले होते. नीतीयुक्त राजनीतीचे प्रतीक बनले होते.

तत्कालीन प्रस्थापित राजकारणाला भ्रष्टाचारमुक्त पर्याय उभा करण्यासाठी विश्वनाथ प्रतापसिंग स्वच्छ प्रतिमेचा खात्रीचा चेहरा बनले होते. पण मंडल आयोग लागू करताच ते खलनायक वाटू लागते. व्यक्ती तीच होती, विश्वनाथ प्रतापसिंग, पण एका निर्णयाने माणसाची प्रतिमा सुलटची उलट बनविली. एवढा धसका मंडल आयोगाचा अर्थात ओबीसींना आरक्षण लागू होण्याचा का घेतला गेला? एससी एसटीच्या आरक्षणाला छुपा–खुला विरोध करत ज्यांनी ओबीसींची माथी भडकवली, आता मंडल शिफारशी नुसार ओबीसींना मिळणार असलेल्या आरक्षणामुळे त्यांच्या पोटात गोळा येऊ ला–गला. एससी–एसटीचे २२.५% आरक्षण कोटा वगळता संपूर्ण खुल्या प्रवर्गात ओबीसींना डावलून उच्चवर्णीयांचे उखळ पांढरे होत होते. उच्चवर्णीयांची प्रशासनात असलेली सद्दी ओबीसी आरक्षणामुळे पूर्णतः संपली तर नसतीच, पण ओबीसीचा टक्का वाढल्याने उच्चजातीयांच्या बरोबरीचा वाटा ओबीसींना प्रशासनात, निर्णय प्रक्रियेत नकोच! ओबीसींची उच्चजातीसोबत बरोबरी नको! हिच उच्चजातीय समूहाची कपटनिती राहिलेली आहे. "प्रधानमंत्री व्ही.पी.सिंग (१९८९–१९९०) यांचे उदाहरण अगदी अलिकडचे आहे. मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार ओबीसींना नोकऱ्यात राखीव जागा देण्याचा निर्णय घेतल्याने ब्राम्हणांचे नोकऱ्यातील प्रमाण काहीसे कमी होण्याची स्थिती निर्माण झाली होती. खरे तर वंचित समाजाला, इतर मागासवर्गाला संधी देण्यासाठी हा निर्णय घेतल्या गेला होता. परंतु ओबीसींना हलाखीच्या अवस्थतेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न मनुस्मृतीच्या समर्थकांना देशद्रोह वाटला.

ब्राम्हणाचे प्राबल्य कमी करणारा निर्णय म्हणून त्याकडे पाहिले गेले आणि प्रसार माध्यमामधून व्ही.पी.सिंगांची प्रचंड बदनामी केली गेली. वरच्या हिंदूसाठी राबणाऱ्या हिंदुत्ववादी संघटनांकडून व्ही.पी.सिंगांना, विलन ठरविले गेले, रावण संबोधून प्रतिमांचे दहन केले गेले. ज्या संघटना, राजकीय पक्ष अयोध्येला राममंदिर बांधण्यासाठी धडपडतात त्या सर्व ओबीसी विरोधी आहे मागास जातींच्या विरोधी आहे. मुस्लिमविरोधी आहे. मंडल आयोगाला विरोध करून त्यांनी मागासजाती आणि मुस्लिमांना टार्गेट केले. म्हणजे ब्राह्मणच शासन, प्रशासनात राहू शकतात, उच्च स्थानी राहू शकतात, आरक्षणाच्या माध्यमातून मागासवर्गीय आले तरी त्यांना दुय्यम स्थाने दिली जातात. उच्च जात सत्ता टिकविली जाते. (पृ. ३५–३६, रा. स्व. संघ, जातीव्यवस्था आणि हिंदुराष्ट्र, ले. नागेश चौधरी) म्हणून ओबीसी आरक्षणास कळीचा विरोध होता. त्यामुळे व्ही.पी.सिंगांनी मंडल आयोग लागू करताच ब्रह्मवृंदाचा जळफळाट पाहण्याजोगा होता. व्ही.पी.सिंग मात्र निर्णयावर ठाम होते. मंडलचा निर्णय फिरवला असता, तर कदाचित ते बचावले असते. ते दीर्घकाळ प्रधानमंत्री पदावर कायम राहिले असते. अटलबिहारी वाजपेयींना राजयोगाने हुलकावणीही दिली असती. घोटाळ्यांची दीर्घमालिका ज्यांच्या काळात गाजली ते पी.व्ही.नरसिंहरावांसारखे प्यादे चालले नसते.व्ही.पी.सिंग सरकार पडल्यानंतर जनता दल या पक्षाचेही अपूर्व नुकसान झाले. देशभर जनता दलाचा वाढलेला जनाधार खंडित होऊ लागला. जनता दलाचे विभाजन होऊन राष्ट्रीय पातळीवरील सक्षम पर्याय खिळखिळा होऊ लागला. मंडल विरुद्ध कमंडल रान पेटले ते ओबीसी हित विरोधासाठी, राम रथयात्रा, हिंदुत्वाचा टेंभा, मुस्लिम–विरोधाचा तडका, धार्मिक दंगे, बॉम्ब स्फोट भडका, बाबरी विध्वंस आणि जातीय–धार्मिक तेढ निर्माण करुन, ओबीसींना मंडलच्या लढ्यापासून दूर दूर नेण्यासाठीच ह्या कुरापती होत्या, असाच या घटनाक्रमाचा अन्वयार्थ लागेल. मंडलची घोषणा झाली नसती तर कदाचित हा घटनाक्रम वेगळा दिसला असता पण मंडलच्या घोषणेने ही जरतरची समीकरणे बिघडवून टाकली.

व्ही.पी.सिंगांनी निवडणूक जाहीरनाम्यात दिलेला शब्द पाळला. ते ओबीसीचा मसीहा ठरलेत. व्ही.पी.सिंग सरकार पडले, पण व्ही.पी.सिंग जिंकले.व्ही.पी.सिंगांनी स्वकीय जनांच्या हितासाठी ओबीसींच्या सुखासाठी, नीती मूल्याधिष्ठित तत्वासाठी प्रधानमंत्री पदाकडे कानाडोळा केला. सत्तेची पर्वा केली नाही. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला प्रतिष्ठा प्राप्त झाली. सामाजिक न्याय, ओबीसीकेंद्रित राजकारणाचा होरा दिसू लागला.व्ही.पी.सिंग या मूल्याधिष्ठित राजनीतीचे महानायक होते.

**अनुज हुलके**

# अप्रिय घटना टाळण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे-जिल्हाधिकारी नायर



### कोरणीघाट रजेगाव बाघनदी येथे जिल्हाधिकारी यांची भेट

## आपत्ती दरम्यान प्रशासनान व नागरिकांनी एकमेकांशी समन्वय ठेवावे-जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**पूर परिस्थितीवर मात करणे शक्य आहे. आपत्ती दरम्यान नागरिकांच्या कोणत्याही मदतीसाठी जिल्हा प्रशासन नेहमीच सज्ज आहे. प्रशासन व नागरिक हे समाजातील घटकाचे दोन बाजू आहेत, अश्या परिस्थितीत आपत्ती दरम्यान प्रशासनान व नागरिकांनी एकमेकांशी समन्वय ठेवून पूर परिस्थितीवर मात करण्यासाठी एकत्रित यावे, असे आवाहन पूर परिस्थिती पाहणी दरम्यान जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी उपस्थित नागरिकांना केले.**

**गोंदिया :-** गोंदिया जिल्हा हा निसर्गाने नटलेला जिल्हा आहे. मान्सून कालावधीत पूर परिस्थितीचे आव्हान पेलण्यासाठी जिल्हा प्रशासन ताकदीने सज्ज आहे, मात्र जिल्ह्यात अप्रिय घटना टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनास नागरिकांनी सहकार्य करावे, असे वक्तव्य जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी १९ जून रोजी महाराष्ट्र - मध्यप्रदेश राज्यच्या सीमेला लागून असलेल्या बाघ नदीवरील कोरणीघाट, रजेगाव येथे संभाव्य पूरपरिस्थिती असलेल्या भागाची पाहणी दरम्यान केले.

जिल्ह्यातील ९६ गावांना पुराचा संभाव्य धोका आहे. मान्सून कालावधी सुरु झाली असून जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली आहे. म्हणून जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी पूर प्रवण भागात भेट देवून मान्सून पुर्वतयारीच्या अनुषंगाने केलेले नियोजन व भौगोलिक परिस्थितीची पाहणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी यांच्या समवेत समशेर पठाण तहसीलदार गोंदिया, वैभव पवार पोलीस निरीक्षक रावणवाडी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, मंडळ अधिकारी, तलाठी व विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्ट चे सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.

**ती घटना दुर्दैवी...**

गोंदिया तालुक्यातील कोरणीघाट येथे दि.८ जून रोजी नदीपात्रात पाण्यात बुडून ३ महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. यावेळेस जिल्हाधिकारी नायर यांनी सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली व तात्काळ भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यास आपत्ती व्यवस्थापन विभागास निर्देश दिले. यावेळेस जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गोंदिया तर्फे विठ्ठल रुक्मिणी ट्रस्ट कोरणी घाट रजेगाव यांना भाविकांच्या सुरक्षेसाठी अप्रिय घटना टाळण्यासाठी १० नग लाईफ जॅकेट, ०५ नग लाईफबॉय व एक रोप बंडल प्रतिबंधात्मक उपाय योजनेचा एक भाग म्हणून प्रदान करण्यात आले. तसेच सदर ट्रस्टच्या सदस्यांना या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना आवश्यक ती सावधगिरी बाळगण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

# रस्ता दुरूस्तीसाठी बोरावासी रस्त्यावर

### दोन दशकांपासून रस्ता दुरूस्तीच्या प्रतीक्षेत





**गोंदिया:-**वारंवार रस्ता दुरूस्तीची मागणी करूनही रस्ता दुरूस्त करण्यात न आल्याने २१ जून रोजी शेकडो नागरीकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. यावेळी लोकप्रतिनिधी व प्रशासनाचा निषेध करून तीव्र संताप व्यक्त केला.

तिरोडा तालक्यातील बोरा ते परसवाडा या तीन किमी रस्त्याचे २० वर्षापुर्वी खडीकरण व डांबरीकरण करण्यात आले. आज या रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावरून वाहने चालविणे तर सोडा पायी चालणे कठीण झाले आहे. बोरा, सोनेगाव, डब्बेटोला, काचेवाणी आदी गावांसाठी हा रस्ता अतिमहत्वाचा आहे. परसवाडा गाव परिसराच्या केंद्रस्थानी असून येथे माध्यमिक तथा उच्च माध्यमिक शाळा, दोन राष्ट्रीयकृत बँका, पतसंस्था, व्यापारी प्रतिष्ठाणे आहेत. त्यामुळे येथून विद्यार्थी, नागरिक, शेतकरी यांची नेहमी वदर्ळ असते. रस्ता दुरूस्ती अभावी ठिकठिकाणी निकामी झाला आहे.

ग्रामपंचायत व स्थानिकांनी अनेकदा बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधी यांना रस्ता दुरूस्तीसाठी निवेदन दिले. मात्र आश्वासनांच्या गाजराशिवाय काही मिळाले नाही. रस्ता दुरूस्तीच्या नावावर लाखो रुपयांचे बिल काढण्यात आल्याचा आरोपही यावेळी ग्रामस्थांनी केला. ग्रामपंचायत इमारतीच्या लोकार्पण कार्यक्रमात जिप सदस्य पवन पटले यांनी सहा महिन्यात रस्ता दुरूस्तीची ग्वाही दिली होती. त्यांचे प्रयत्नही निष्पळ पडले.

बोरा-परसवाडा रस्ता परसवाडा-धापेवाडा-गोंदिया मार्ग व तिरोडा-अर्जुनी-बालाघाट या आंतरराज्यीय मार्गाला जुळतो. हा रस्ता महत्वाचा असूनही लोकप्रतिनिधी व बांधकाम विभाग दुरूस्तीसाठी गंभीर नाही. अखेर ग्रामस्थांच्या संयमाचा बांध टुटला व त्यांनी आज रस्त्यावर उतरून आंदोलन केले. दरम्यान कुणीही जबाबदार लोकप्रतिनिधी व अधिकारी यांनी आंदोलनस्थळी भेट दिली नाही.

बांधकाम विभागाच्या अभियंत्याने भ्रमणध्वनीवरून रस्ता दुरूस्तीसाठी निधी मंजूर झाला असून लवकरच कामाला सुरवात करण्यात येणार असल्याचे सांगितल्यानंतर आंदोलन तुर्तास थांबविण्यात आले. प्रसंगी चार दिवसांत रस्ता दुरूस्तीच्या कामाला सुरवात न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देखील यावेळी बोरावासीयांनी प्रशासनाला दिला. यावेळी सरपंच राखी नागपूरे, तंमुस अध्यक्ष संदेशसिंग हिरापूरे, माजी जिप सदस्य डॉ. योगेंद्र भगत, माजी सरपंच प्रेमलाल पटले, पोलिस पाटील छत्रपती पटले, सामाजिक कार्यकर्ता अजाबलाल नागपूरे, रंजीत नागपूरे, दिनेश चौधरी, संतोष पटले यांच्यासह शेकडो बोरावासी महिला, पुरुष उपस्थित होते.

# चालक-पोलिसांतील संवाद आता कॅमेराबंद



**सद्यास्थितीत गोदिया शहरातील वाहतूक पोलिसांना ते देण्यात येणार आहेत. या कॅमेरामुळे वाहनचालक आणि वाहतूक पोलिसांना मदत होणार आहे.**
**- गोरख भामरे, पोलिस अधीक्षक**

**गोंदिया:-** कधीकधी चालक आणि वाहतूक पोलिसांमध्ये शाब्दिक चकामक होते. मात्र त्याचा पुरावा नसल्याने कर्मचारी किंवा वाहन चालकावर कारवाई करता येत नाही. हिच बाब हेरून गोंदिया पोलिस दलाने प्रायोगिक तत्वावर २० कॉलर कॅमेरे मागविण्यात आले असून ते शहरातील विविध ठिकाणी नेमणूक असलेल्या वाहतूक पोलिसांच्या कॉलरवर लावण्यात येणार आहेत. त्याची सुरुवात शुक्रवारी (दि. २०) पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांच्या हस्ते पतंगा मैदान चौकात करण्यात आली.

शहराचा व्याप दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यातच वाहनांची संख्या देखील जिल्ह्यात वाढतच आहे. अशात वाहतूक नियम न पाळणारे देखील आहेतच. अशात ठिकठिकाणी तैनात असलेले वाहतूक पोलिस आणि वाहनचालकांमध्ये शाब्दिक चकामक होते. अनेकदा वरिष्ठांकडे तक्रारीपर्यंत देखील वाद जावून पोहोचतात. काही प्रकरणे न्यायालयात देखील गेली. हा सर्व प्रकार थांबून खरी स्थिती काय, हे कळावी, यासाठी गोंदिया जिल्हा वाहतूक शाखेने साडेतीन लाख रुपयांचा खर्च

करून २० कॉलर कॅमेरे खरेदी केले. ते कॅमेरे तीन अधिकारी आणि १७ वाहतूक नियंत्रक पोलिस कर्मचाऱ्यांच्या कॉलरवर लावण्यात येणार आहेत. प्रती कॅमेरा १७ हजार रुपये दराने खरेदी करण्यात आले आहेत. पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांच्या हस्ते आणि जिल्हा वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक नागेश भास्कर यांच्या उपस्थितीत पतंगा मैदान फुलचूर येथे वाहतूक नियंत्रणाकरीता तैनात असलेल्या कर्मचाऱ्यांच्या कॉलरवर हे कॅमेरे बसविण्यात आले. सद्यस्थितीत २० कॅमेरे असल्यामुळे ते शहरातील वाहतूक कर्मचाऱ्यांनाच देण्यात येणार आहेत. या कॅमेरांत मेमरी कार्ड असून त्यात दिवसभरातील सर्व क्षण कैद होणार आहेत. यामुळे वाहनचालक आणि वाहतूक पोलिस यांना देखील सोयीचे होणार आहे.

# गोंदिया जि.प. कर्मचारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी प्रथमच महिलेची वर्णी

**गोंदिया :-** जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी प्रथमच महिला संचालकाची निवड झाली आहे. कृषी विभागातील कनिष्ठ सहायक दीपिका मोहन यादव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी चंद्रशेखर शिवराम चौधरी, शाखा अभियंता, बांधकाम उपविभाग, पंचायत समिती अर्जुनी मोरगाव यांची बिनविरोध निवड झाली.



संस्थेचा अडीच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने माजी अध्यक्ष मनोज गोंडाणे (आरोग्य विभाग) आणि उपाध्यक्ष आनंदकुमार चर्जे (लेखा विभाग) यांनी राजीनामा दिला होता. निवड प्रक्रिया जिल्हा सहकारी उपनिबंधक सिद्धार्थ गणवीर यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेचे सचिव कमलेश बिसेन यांच्या उपस्थितीत पार पडली.

संचालक सचिन कुथे, मनोज गोंडाणे, आनंदकुमार चार्जे, कुवरलाल रहांगडाले, हंसराज गजभिये, ओमेश्वर बिसेन, रितेशकुमार शहारे, अजयकुमार रामटेके, मनोज भुरे, वीरेंद्र कुंभरे, सुनील राठोड, रेखा पारधी, प्रेमलता बागडे, संगीता बिसेन, नामदेव मेश्राम, रविकुमार पटले, चंद्रकांत धपाडे, दयानंद फटिंग, सीमा भगत यांच्या उपस्थितीत निवड झाली आहे.

अविरोध निवडून आलेल्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा सत्कार प्रल्हाद शहारे, शैलेश कुमार बैस, सौरभ अग्रवाल, संतोष तोमर, नंदलाल कावळे, भगीरथ नेवारे, तेजस्विनी चेटुले, चित्रा ठेंगरे, ओम कापगते, प्रदीप ठाकरे, नम्रता रंगारी, रजनी सहारे, गीता चौधरी, शारदा ठवरे व अनेक अधिकारी व कर्मचारी वर्गाने केला.

## जिल्ह्यात २६ जून रोजी सामाजिक न्याय दिन उत्साहात साजरा होणार

गोंदिया: राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिवस, २६ जून, हा संपूर्ण महाराष्ट्रात ङ्गसामाजिक न्याय दिनङ्ग म्हणून साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर गोंदिया जिल्ह्यात सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त किशोर भोयर यांनी केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत गोंदिया जिल्हात कार्यरत शासकीय वसतीगृहे, शासकीय निवासी शाळा येथील इयत्ता १० वी व १२ वी मध्ये प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचे सत्कार तसेच सन २०२३-२४ मधील विविध पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त भाष्कर गायकवाड ता. तिरोडा यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य याबाबत मार्गदर्शन व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

# जि.प.शाळा प्रवेशावर करमाफी अशक्य

**ग्राम पंचायतीमार्फत गोळा करण्यात येणारा कर माफ करण्याचा ग्राम पंचायतींना अधिकार नाही. त्यात सवलत देता येवू शकते. कर माफ केल्यास शासनाच्या योजनांवर परिणाम होणार आहे.**
**- मधुकर वासनिक, उपमुकाअ पंचायत विभाग, जि. प. गोंदिया**

**गोंदिया:-**. गावातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्रवेश वाढावेत आणि त्यांना पुन्हा भरभराटी यावी, याकरीता काही ग्रामपंचायतींनी आपल्या पाल्यांना जि.प. शाळेत प्रवेश द्या आणि घर कर्जमुक्ती मिळवा, असा ठराव पारीत केला. परंतु, यावर जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाने आक्षेप घेतला असून अशामुळे गावातील विकासकामांवर परिणाम होणार असल्यामुळे तो निर्णय चुकीचा असल्याचे म्हटले आहे.

भौतिक सुविधांव्यतिरिक्त, जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या

कमी झाली आहे आणि जिल्हा परिषद शाळा धोक्यात आल्या आहेत. अनेक शाळांना तर टाळे लावावे लागले आहेत. काही शाळा बंदही कराव्या लागल्या आहेत. हे पाहता जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींनी जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेश मिळाल्यावर घर आणि पाणी कर माफ केला जाईल असा ठराव घेतला. जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या पालकांचा कर संबंधित ग्रामपंचायतीकडून माफ केला जाईल असे प्रस्तावात नमूद केले आहे. प्रस्ताव चांगला आहे, परंतु तो कायद्याच्या विरुद्ध आहे. कर माफ करण्याचा अधिकार कोणत्याही ग्रामपंचायत प्रशासनाला देण्यात आलेला नाही. अशा प्रस्तावांना प्रशासन मान्यता देत नाही. उलट, जर थकबाकीदारांनी वेळेवर कर भरला आणि तो एकत्रितपणे भरला तर त्यांना कर सवलत दिली जाते, परंतु कर माफ केला जात नाही, असे जिल्हा परिषदेने म्हटले आहे.त्यामुळे ग्रामपंचातींनी घेतलेल्या निर्णयावर आता गदा येणार असून ठराव मागे घ्यावा लागणार आहे.

# सात गावांचा ग्रामपंचायत अध्यादेश रखडल्याने संताप

**गोंदिया :-** आमगाव नगर परिषद क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या सात गावांचा ग्रामपंचायत अध्यादेश अद्यापही निघाला नसल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा महासचिव तिरथ येटरे यांनी प्रशासक, कर्मचारी व ठेकेदारांच्या संगनमताने हा प्रकार टाळाटाळ करीत असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

पुढील १५ दिवसांत सातही गावांसाठी स्वतंत्र ग्रामपंचायत बहाल करण्याचा अध्यादेश काढला गेला नाही, तर आम्ही गावातील नागरिक व लोकप्रतिनिधींना घेऊन आमगाव तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढू, असा इशारा येटरे यांनी प्रशासन व ग्रामविकास विभागाला पत्रातून दिला आहे.




महाराष्ट्र शासनाने २५ ऑक्टोबर २०२४ रोजी आमगाव नगर परिषदसंदर्भातील याचिका मागे घेतली होती. त्यानंतर २८ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आमगाव नगर परिषद क्षेत्रातून रिसामा, बनगाव, माल्ही, कुंभारटोली, किंडगीपार, बिरसी व पदमपूर ही सात गावे वगळली जात आहेत, असा आदेश प्रसिद्ध करण्यात आला. आमगाव स्वतंत्र नगरपंचायत राहणार आहे. शासनाने २८ एप्रिल २०२५ पर्यंत आक्षेप नोंदवण्याची मुदतही दिली होती. मात्र, यानंतर पाच महिने उलटून गेले तरी ग्रामपंचायत बहाल करण्याबाबत कोणताही नवीन अध्यादेश ग्रामविकास विभागाने जारी केला नाही. आमगाव नगर परिषदेत स्थायी प्रशासक, कर्मचारी व ठेकेदार शासनातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करीत असून, बोगस बिलिंग सुरू आहे. त्यामुळेच सातही गावांचा अध्यादेश टाळण्यात येत आहे, असा आरोप रिसामाचे माजी उपसरपंच तिरथ येटरे यांनी केला आहे.

# रिक्षा चालकांना गणवेशासह नियमांचा विसर

## काय सांगतो, मोटार वाहन कायदा?

**मोटार वाहन कायदा, १९८८, रिक्षांसह सर्व रस्त्यावरील वाहनांना लागू होतो. या कायद्यात रिक्षांच्या नोंदणी, परवाना, वाहतूक आणि सुरक्षिततेसाठी नियम आणि दंड दिले आहेत. रिक्षांची नोंदणी आरटीओ कार्यालयात करणे आवश्यक आहे. रिक्षा चालवण्यासाठी वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक आहे.**

## क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक

**जिल्ह्यात रिक्षा व काळीपिवळी ट्रॅक्सीची संख्या बरीच आहे. जिल्ह्याच्या दुर्गम व अतिदुर्गम भागात महामंडळाच्या बसेस पोहोचत नसल्याने प्रवाशांसाठी रिक्षा व काळीपिवळी ट्रॅक्सी याच वाहनांचा पर्याय आहे. दरम्यान दुर्गम भागातील खासगी वाहन चालक क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसवून सर्रास वाहतूक करतात. ९ ते १० प्रवासी वाहतुकीचा परवाना असतात १२ ते १३ प्रवाशांची वाहतूक केली जात असल्याचे दिसून येते. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे. परंतु, तसे होताना दिसून येत नाही. यामुळे ग्रामीण भागात प्रवासी कोबून वाहतूक केली जात असल्याचे बोलले जात आहे**



**गोंदिया :-** शहरात सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या काळी पिवळी ट्रॅक्सी चालक तसेच रिक्षाचालकांकडून सर्रास नियम मोडले जातात. रिक्षाचालकांना बंधनकारक असलेल्या गणवेशाचा वापर त्यांच्याकडून केला जात नाही. नियम मोडणाऱ्या या चालकांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जात नसल्याने प्रवाशांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे. शिवाय प्रवासी मिळिवण्याच्या शर्यतीत रिक्षा चालक प्रवाशांशी हुज्जत घालताना दिसून येत आहेत.

मोटार वाहन कायदा, १९८८, देशामध्ये रस्ते वाहतुकीचे नियमन करणारा एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्यात वाहन चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या परवान्यांपासून,वाहनांच्या वाहतुकीचे नोंदणीपर्यंत नियम ,आणि तसेच उल्लंघनासाठी दंड आणि विमा यांसारख्या अनेक गोष्टीचा समावेश आहे. वाहन चालवण्यासाठी वैध परवाना असणे आवश्यक आहे. सर्व मोटार वाहनांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. एवढेच नाही तर मुदतबाह्य वाहने चालविली जातात. मालवाहू व सर्वच चारचाकी वाहनाला मार्गावर धावण्याची मुदत १५ वर्ष आहे. मात्र ग्रामिण व शहरी भागात अनेक

रिक्षा तसेच काळी पिवळी ट्रॅक्सी मुदतबाह्य झाल्याचे दिसून येते. मात्र वाहतूक विभाग आणि पोलिस विभाग अशा वाहनांवर कारवाई करताना ग्रामीण भागात दिसून येत नाही. या सर्व प्रकाराकडे वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष आहे. यामुळे शहरात रिक्षा चालकांचा मनमानी कारभार वाढत चालला आहे.

# पाच गावे मिळून तयार झाली सालेकसा नगरपंचायत




**सालेकसा :-** येत्या ऑक्टोबर महिन्यात सालेकसा नगरपंचायतची निवडणूक होण्याची शक्यता असून त्यासाठी प्रभाग रचनेच्या कार्यक्रम सुरू झाला आहे. सालेकसा आणि आमगाव खुर्द मिळून एकूण २२४४.७५ हेक्टर आर क्षेत्रावर विस्तारित असा भाग नगरपंचायत क्षेत्रात समाविष्ट आहे. त्यामुळे ही नगरपंचायत लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून छोटी असली तरी भौगोलिकदृष्ट्या जिल्ह्यातील सर्वात मोठे क्षेत्रफळ असलेली नगरपंचायत ठरणार आहे.

नगरपंचायतमध्ये आता सालेकसा व आमगाव खुर्द या दोन ग्रामपंचायतींचा समावेश झाला आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार सालेकसा येथील ३६८४ आणि खामगाव खुर्द येथील ५१९७लोकसंख्या मिळून एकूण ८८८७लोकसंख्येच्या समावेश या विस्तारित नगरपंचायतमध्ये आहे. नगरपंचायतमध्ये सालेकसा क्षेत्रातील सालेकसा, हलबीटोला, बाकलसर्रा, जांभळी या मोठ्या गावांचा समावेश असून त्या अंतर्गत मुरूमटोला, कोवाचीटोला, लोधीटोला, रामजीनगरसह इतर छोट्या गावांच्यासुद्धा समावेश आहे. महसुली रेकॉर्ड प्रमाणे सालेकसा येथील ३३३.२४ हेक्टर आर क्षेत्रफळ हलबीटोला येथील ३५८.४६ हेक्टर आर क्षेत्रफळ बाकलसर्रा येथील ५०७.२२ हेक्टर आर क्षेत्रफळ, जांभळी येथील ६८३.८५ हेक्टर आर क्षेत्रफळाचा समावेश आहे. तर आमगाव खुर्द येथील एकूण ३६१.९८ हेक्टर क्षेत्रफळाचा समावेश केला जात आहे. असे एकूण २२४४.७५ हेक्टर आर असलेल्या क्षेत्रावर विस्तारित नगरपंचायतचे क्षेत्रफळ निश्चित होणार आहे. २०११ च्या जनगणनेनुसार सालेकसा परिसरातील ३६८४ लोकसंख्येच्या समावेश असून यामध्ये सालेकसा येथील १०२३, हलबीटोला येथील १६४८, बाकलसर्रा येथील ३५७ आणि जांभळी येथील ६६२ एवढी लोकसंख्या तसेच आमगाव खुर्द क्षेत्रातील ५१९७ लोकसंख्येच्या समावेश आहे. असे एकूण ८८८७ लोकसंख्या असलेला नगरपंचायत क्षेत्र राहील. नगरपंचायतमध्ये एकूण १९६६ कुटुंबांचा समावेश आहे. सालेकसा येथील २१७कुटुंबे, हलबीटोला येथील ३७८, बाकलसर्रा येथील ८६, जांभळी येथील १४१ आणि आमगाव खुर्द येथील ११४४ कुटुंबांचा समावेश होत आहे.

# अधिकाऱ्यांनी दिली गोरें येथील आरोग्य केंद्राला भेट

**गोंदिया :-**आरोग्य विभागातील जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मंगळवारी (दि.१७) सालेकसा तालुक्यातील अतिदुर्गम व आदिवासी भागातील ग्राम गोर्रे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली.




या भेटीत त्यांनी आरोग्य कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका यांच्याशी संवाद साधून आदिवासी, नक्षल भागात जाणवणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पथकात जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. रोशन राऊत, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विनोद चव्हाण, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल आत्राम, गोर्हे प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. भगवतप्रसाद बारई, भरारी पथकचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुखदा पांडे यांचा समावेश होता.

याप्रसंगी डॉ. राऊत यांनी, माता व बाल प्रजनन कार्यक्रम अंतर्गत लहान बालक, किशोरवयीन मुले-मुली, गरोदर व स्तनदा माता, वयोवृद्धांना अतिजोखमी प्रसंगी आरोग्य सेवा देताना विविध अडचणींची माहिती जाणून घेतली. तसेच आरोग्य सेवा देताना देण्यात येणारा पोषण आहार व कुपोषण या विषयावर अंगणवाडी सेविकांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. आदिवासीबहुल क्षेत्रात विविध साथीचे आजार त्यासोबत सिकलसेल, क्षयरोग, हिवताप, कुष्ठरोगबाबत त्यांची अंधश्रद्धा विचारसरणी यावर चर्चा केली. जंगलव्याप्त भाग असल्याने पावसाळ्यात कुत्राचावा, सर्पदंश व विंचू दंश याबाबतची माहिती घेतली.डॉ. चव्हाण यांनी, कीटकजन्य व जलजन्य आजारांबाबतची माहिती घेत कार्यक्षेत्रात कीटकजन्य आजारांचे प्रमाण करण्यासाठी विविध मुद्यावर चर्चा केली.

# महाराष्ट्रात सारस पक्ष्यांची ३४ संख्या

## गोंदिया जिल्ह्यात २ ने वाढली सारस पक्ष्यांची संख्या, यावर्षी ३० पक्ष्यांची नोंद



**गोंदिया :-**२०२५ च्या वार्षिक सारस पक्षी गणनेनुसार, महाराष्ट्र राज्यातील सारस पक्ष्यांची संख्या ३४ एवढी नोंदविण्यात आली आहे. ही गणना विशेषतः गोंदिया व भंडारा जिल्ह्यांमध्ये, तसेच त्यांच्यालगतच्या सीमा भागांमध्ये करण्यात आली आहे.१५ व १६ जून रोजी भंडारा व गोंदिया वनविभाग व सेवा संस्थानसह जिल्ह्यातील विविध अशासकीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सारस पक्षी प्रगणनेचे आयोजन करण्यात आले होते.तर शेजारील मध्यप्रदेश राज्यातील बालाघाट जिल्ह्यात ४८ सारस पक्ष्यांची नोंद करण्यात आली.

बाघ व वैनगंगा नद्या महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील अनुक्रमे गोंदिया व बालाघाट जिल्ह्यांना विभागणाऱ्या प्रमुख नद्या आहेत. भौगोलिकदृष्ट्या या नद्यांच्या दोन्ही तीरांवरील परिसरांमध्ये समान हवामान, जमीन प्रकार आणि शेती पद्धतीमुळे जैवविविधतेत अनेक साम्ये आढळतात. या परिसंस्थात्मक साम्यामुळे काही सारस पक्ष्यांचे जोडपे अधिवास आणि अन्नसंधानासाठी या दोन्ही प्रदेशांमध्ये मुक्तपणे संचार करताना आढळतात. यामध्ये विशेषतः प्रजनन काळात किंवा विश्रांतीसाठी दोन्ही बाजूंच्या शेतक्षेत्रांचा वापर होत असल्याचे निरीक्षणातून स्पष्ट झाले आहे.न्यायालयाच्या निर्देशानंतर गोंदिया व भंडारा जिल्हा प्रशासनाने याकडे लक्ष देण्यास सुरवात केली आहे.

**महाराष्ट्र मध्यप्रदेश सारस गणना २०२५**
**गोंदिया जिला - ३०**
**बालाघाट जिला - ४८**
**भंडारा जिला - ०४**

गोंदिया जिल्ह्यातील सारस पक्ष्यांचे अधिवास असलेल्या गोंदिया, तिरोडा व आमगाव तालुक्यांतर्गत एकूण ७० वेगवेगळ्या ठिकाणी जिल्ह्यातील अशासकीय स्वयंसेवी संस्थेचे स्वयंसेवक, सारस मित्र, शेतकरी व गोंदिया वनविभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही गणना सकाळी ५ ते ९ वाजेपर्यंत केलेली असून सारस पक्षी प्रगणनेमध्ये एकूण ३० सारस पक्ष्यांची नोंद झालेली आहे.सारस पक्ष्यांची प्रगणना करण्यासाठी एकूण ३५ चमू तयार करण्यात आले होते. प्रत्येक चमूमध्ये स्वयंसेवी संस्थेचे स्वयंसेवक, सारस मित्र, स्थानिक प्रतिनिधी/शेतकरी, वन विभागातील वनपाल, वनरक्षक असे एकूण २ ते ४ व्यक्ती असे १४०-१५० सदस्यांनी या नोंदणीत सहभाग घेतला.सारस पक्षी प्रगणनेकरीता गोंदिया जिल्ह्यातील सेवा संस्था व इतर अशासकीय संस्थेचे स्वयंसेवक, सारस मित्र, शेतकरी तसेच गोंदिया,भंडारा व बालाघाट वनविभागातील कर्मचाऱ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवून सारस पक्ष्यांचे अधिवास असलेले पाणथळ जागा, नद्या, शेतांमध्ये, तलावांजवळ जाऊन पाहणी करुन सारस पक्ष्यांची प्रगणना केली.